पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८.
नगरसचिव कार्यालय,
क्रमांक-नस/९/कावि/८५६/२००९
दिनांक- २४.०९.२००९

प्रति,
मा. ......................................,
सदस्य, स्थायी समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-४११ ०१८.

विषय- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची सभा दिनांक २९.०९.२००९ रोजी आयोजित केलेबाबत....

महोदय/महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहीक सभा मंगळवार, दिनांक २९.९.२००९ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

आपला विश्वासू,

सही/-
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-१८

प्रत:- १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.

मा.स्थायी समिती

कार्यपत्रिका क्रमांक-१३४

दिनांक- २९.९.२००९ वेळ- दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहीक सभा मंगळवार, दिनांक २९.९.२००९ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

अ) दिनांक १५.९.२००९ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १३२) सभावृत्तांत कायम करणे.
(दि.२९.९.२००९ चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे)

ब) दिनांक २२.९.२००९ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १३३) सभावृत्तांत कायम करणे.

विषय क्रमांक- १) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध विभागांना आवश्यक असलेले प्रिंटर्स, युपीएस इ खरेदी करणेसाठी एकुण ३ निविदा प्राप्त झाल्या असुन त्यामधील प्राप्त लघुत्तम दराप्रमाणे एकुण र.रु.३७,४४,४००/- चे साहीत्य [1) M/s. Aditi Enterprises, Pune – Rs.25,94,000/-, 2) M/s.Fancy Computers And Periphearls – Rs.6,55,000/-, 3) M/s.Monarch Technologies (Pune) P.Ltd. – Rs.4,95,400/-] खरेदी करणेस व निविदाकारांबरोबर करारनामा करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- २) चिंचवड प्रेक्षागृहातील ध्वनिक्षेपण यंत्रणेची चलन देखभाल दुरुस्ती करणे या कामाचा वाढीव खर्च र.रु.३,२५,८४०/- सुधारीत एकूण खर्च र.रु.४,२१,७६८/- यांस लेखापरिक्षण आक्षेपपुर्ततेस कार्योत्तर मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- ३) पवनानदीपात्रातील हायसिंथ काढणेकामी प्राप्त झालेल्या दरांपैकी मे.एच.सी.लुंकड यांचे दर पोकलन प्रती तास २२००/- व डंपर प्रति दिन र.रु.३०००/- कमी दर असुन मनपा आर्थिकदृष्ट्या फायदेशीर असल्याने सदर दर स्विकारणेस व करारनामा न करता थेट पद्धतीने मे.एच.सी. लुंकड यांचेकडून दि.२०/७/०९ ते २४/७/०९ या कालावधीत काम करुन घेतलेने त्याकामी सेवाकरासह अंदाजे र.रु.१,५५,५२३/- खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- ४) वाहन क्रमांक एमएच १४ एई ८१९९ (करोला) या वाहनासाठी ५ ट्युबलेस टायर खरेदीकरिता आलेला प्रत्यक्ष र.रु.२१,२३५/- खर्चास कार्योत्तर मान्यता तसेच यापुढे सदर वाहनासाठी ब्रिजस्टोन कंपनीच्या अधिकृत डिलर्सकडून ट्युबलेस टायर खरेदी करण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- ५) भुमि आणि जिंदगी विभागाकडे सहा.आयुक्त पदासाठी केलेली र.रु.१५,००,०००/- तरतुदीमधून र.रु.४,००,०००/- फक्त कर्मचारी/अधिकारी निवासस्थान भाडे या लेखाशिर्षावर वर्ग करण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- ६) मुख्यलेखापरिक्षण विभागामध्ये कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांनी रजा मंजुरीकामी सादर केलेल्या विनंती अर्जानुसार प्रस्तावा सोबतचे प्रपत्र 'अ' मध्ये दर्शविलेप्रमाणे रजा मंजूरीस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- ७) मनपा क प्रभागअंतर्गत सन २००१-०२ मध्ये भांडवली लेखाशिर्षाअंतर्गत कोटेशन व थेट पद्धतीने केलेल्या विविध विद्युत विषयक कामांकरीता एजन्सीस अदा केलेल्या र.रु.६७,३२०/- खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- ८) मनपा क प्रभागअंतर्गत सन २००३-०४ मध्ये भांडवली लेखाशिर्षाअंतर्गत कोटेशन व थेट पद्धतीने केलेल्या विविध विद्युत विषयक कामांकरीता एजन्सीस अदा केलेल्या र.रु.१९,१९३/- खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- ९) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात चैतन्य मेडिकल कॉलेज ऑफ फिजिओथेरपी विद्यार्थ्यांना २५ ऑगस्ट २००९ पासून सहा महिन्यांसाठी प्रशिक्षणासाठी अनुमती देणेस व त्यायोगे प्रति विद्यार्थी प्रति महा र.रु.४२०/- शुल्क आकारणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

सही/-
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८
नगरसचिव विभाग
क्रमांक : नस/७/कावि/८५६/२००९
दिनांक : २४/०९/२००९ चे लगत

टिप : प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेटस्) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.